# मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई.

संदर्भ : माननीय उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र.बी(जन) ५६०१/५७/२०२५/६४, दिनांक ०९.०१.२०२५.

## कार्यालयीन आदेश

(क्र.आस्था१६/ ६११ /२०२५ दिनांक १२.०३.२०२५)

मुख्य न्यायदंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई या कार्यालयाच्या निवड समितीने **'शिपाई/हमाल'** या पदासाठी निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीला माननीय उच्च न्यायालयाने वरील संदर्भांकित पत्रानुसार मंजूरी दिलेली आहे व सदरची निवड व प्रतिक्षा सूची दिनांक ०९.०१.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी मुख्य न्यायदंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई हे या कार्यालयातील **'शिपाई/हमाल'** या पदाच्या रिक्त पदांसाठी निवड यादीतील उमेदवार अनु. क्र. २० ते अनु. क्र. २३ यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करीत आहेत. उपरोक्त उमेदवारांची वेतन सातव्या आयोगाच्या शिफारसीनुसार **रु. १५,०००-४७,६०० (एस-१),** या वेतनश्रेणीमध्ये करण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा करण्यात येईल.

निवड यादीतील खालील नमुद उमेदवार अनु. क्र. २० ते अनु. क्र. २३ यांनी नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत **कार्यालयीन अधीक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, आस्थापना विभाग, तिसरा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे सकाळी ठिक १०.३० वाजता न चुकता हजर रहावे. विहित मुदतीत हजर न राहील्यास सदर उमेदवाराचे नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल, याबाबतची नोंद घ्यावी.

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव व नोंदणी क्रमांक | निवड यादी क्रमांक | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | भावना दयानंद बाईत (BHCDC0319475) | २० | एफ/७२४, वृंदावन बाबुभाई मोरवाला कॉम्प्लेक्स, मजासवाडी, जोगेश्वरी पूर्व, मुंबई - ४०००६०. |
| २ | मनिषा बाळासाहेब सुर्यजोशी (BHCDC0369540) | २१ | मु. पो. खराळा, ता. चांदुर बाजार, जिल्हा - अमरावती ४४४७०४. |

| :०२: | | | |
|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **उमेदवाराचे नाव व नोंदणी क्रमांक** | **निवड यादी क्रमांक** | **उमेदवाराचा पत्ता** |
| ३ | सोहेल मन्सुर शेख (BHCDC0031535) | २२ | कालन गल्ली, औसा, जिल्हा- लातुर ४१३५२०. |
| ४ | कांता विठोबा पडळकर (BHCDC0342020) | २३ | फ्लॅट अे १०३, शुभम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ५३, सेक्टर ६अे, कामोठे, नवी मुंबई - ४१०२०९. |

१) उपरोक्त उमेदवाराची नेमणूक ही अस्थायी स्वरुपाची असेल.

२) उपरोक्त उमेदवारांनी कामावर रूजू होतांना मुळ शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या साक्षांकित प्रती व पॅन कार्ड/आधार कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स (यापैकी एक) सादर करावे.

३) उमेदवारास कामावर रुजू झाल्यानंतर सदर कार्यालयीन आदेशातील अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल.

४) उमेदवारास वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य असेल.

५) उमेदवाराने एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

६) उपरोक्त उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५, अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७.०७.२००७ आणि अंनियो -२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४ दिनांक ०६.०४.२०१५ व त्यानंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार नवीन 'परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना-D.C.P.S.(राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना -NPS)' अथवा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दिनांक २०.०९.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार 'राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना तसेच केंद्र शासनाची एकीकृत निवृत्तिवेतन योजना (UPS)' लागू राहील.

..०३..

७) माननीय उच्च न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशानुसार उमेदवारांना आंतरजिल्हा बदली अर्ज, या कार्यालयात दोन वर्षाची सेवा पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही.

८) उमेदवाराची सेवा निवड यादीनुसार सेवा ज्येष्ठते नुसार राहील.

९) उपरोक्त उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दिलेली माहिती आणि जोडलेली शैक्षणिक व इतर प्रमाणपत्र चुकीची आढळल्यास आणि जर पोलीस पडताळणीत दोषी आढळल्यास त्यांना त्वरित सेवेतून कमी करण्यात येईल.

१०) उपरोक्त उमेदवारांची सेवा ही महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नियमाधीन असेल.

११) उपरोक्त उमेदवारांस प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

12/03/25

(एम.आर.ए.शेख)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

<u>प्रत माहितीकरता :</u>

१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२. प्रबंधक, मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई.
३. उपप्रबंधक/कार्यालयीन अधीक्षक, एस्प्लनेड, मुंबई.
४. मुख्य लिपिक, एस्प्लनेड, मुंबई.
५. गोपनीय विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
६. वेतन आणि रजा व सेवापुस्तक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
७. भविष्य निर्वाह निधी/निवृत्ती वेतन विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
८. सेवार्थ विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
९. रोख विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
१०. संगणक विभाग, एस्प्लनेड, मुंबई.
११. कार्यालयीन आदेश फाईल, एस्प्लनेड, मुंबई.
१२. संबंधित उमेदवार.